महाराष्ट्राचा मानबिंदू
लोकमत
पृष्ठे : १२+४ = १६

# महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, उप-प्रादेशिक कार्यालय, अमरावती-१
## पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीची सुचना

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय ता.जि.अमरावती यांनी त्यांच्या प्रस्तावित ४५ रेतीघाटांच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्याबाबत मंडळाकडे अर्ज सादर केला आहे. सदरील प्रस्तावित प्रकल्पाकरिता भारत सरकारच्या पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्लीचे १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिनियमान्वये व ०१ डिसेंबर, २००९ च्या सुधारित अधिनियमान्वये उपरोक्त प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे.

प्रकल्प प्रवर्तकाच्या विनंतीस अनुसरुन सदर जनसुनावणी पर्यावरण विषयक बाबींबाबत घेण्यात येत असून सदर नियोजित प्रकल्पाच्या परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापीत होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावीत होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पासंबंधी टिका-टिपणी, अभिप्राय किंवा आक्षेप तोंडी किंवा लेखी स्वरुपात नोंदविता येईल.

तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी जिल्ह्याचे संकेतस्थळावर www.amravati.nic.in या ठिकाणी District Survey Report प्रसिद्ध केला आहे. अमरावती जिल्ह्यात ४५ रेतीघाट प्रस्तावित असून त्यांच्या DSR अहवाल शासनाच्या संकेतस्थळावर असुन त्याबाबत नागरिकांचे सूचना/आक्षेप मागविण्यात आले होते.

सदर प्रकल्पासंबंधी पर्यावरण विषयक, सुचना, विचार, टिका-टिपणी, अभिप्राय तसेच आक्षेप ही जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खालील पत्यावर नोंदविण्यात याव्यात किंवा या कार्यालयाच्या ई-मेलवर पाठविण्यात यावेत.

**उप-प्रादेशिक कार्यालय,**
**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,**
**सहकारी सुरभी, बापटवाडी, विवेकानंद कॉलनी, अमरावती. फोन नं. ०७२१-२५६३५९२/९३**
**email- sroamravati1@mpcb.gov.in, roamravati@mpcb.gov.in**

मौखिक किंवा लेखी आक्षेप जाहिर जनसुनावणीच्या वेळेस सुद्धा नोंदविता येईल जाहिर जनसुनावणी खालील ठिकाणी घेण्यात येईल.

**दिनांक : १८/०१/२०२३ , वेळ : दुपारी १२.०० वाजता**

**स्थळ : बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती**

सदर प्रकल्पासाठी पर्यावरण विषयक माहिती असलेले दस्तावेज खालील कार्यालयमध्ये उपलब्ध आहेत. संबंधित व्यक्ती या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये सदर दस्तावेज अभ्यासु शकतील.

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु.) मुंबई- ४०००२२

२. प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती- ४४४६०६

३. उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सहकार सुरभी बापटवाडी, विवेकानंद कॉलनी जवळ, अमरावती - ४४४६०६

४. जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती, जिल्हा परिषद, अमरावती, जिल्हा उद्योग केंद्र, अमरावती

५. जिल्ह्यातील सर्व उप-विभागीय कार्यालये, सर्व तहसिल कार्यालये व ग्रामपंचायत कार्यालय, दोनदाखेरी / शहापूर व सावली बु./ सावळापुर/ हिवरापुर्णा/येसुर्णा व येलकीपूर्णा व निंभारी / ता. अचलपूर, राजुरवाडी, ता.मोर्शी, नायगाव/बोरगाव निस्ताने / गोकुलसरा / दिघी महल्ले, ता. धामणगाव रेल्वे, खाऱ्या टेंभरु / चिचघाट/ रत्नापुर, ता. धारणी, वाठोडा शु./ सोनारखेडा/ भालसी / डांगरखेडा/ गणोजा देवी / दाढी/ कानफोडी / नांदेड खु. / पूर्णानगर, ता.भातकुली, नांदेड बु. / खैरी/ नलवाडा/चांदोळा / करतखेडा / लासुर/ रामतीर्थ/ वडूरा, ता.दर्यापूर, जावरा फत्तेपूर / भारवाडी/ उंबरखेड/ धामंत्री, ता.तिवसा, हिरुळ पुर्णा / तळणी पूर्णा / टाकरखेडा, ता.चांदूर बाजार जि.अमरावती सदर जनसुनावणी दिनांक १८/०१/२०२३ रोजी बचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथे रेतीघाटनिहाय घेण्यात येईल. (सदर जाहिरात मा. जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या मान्यतेने प्रसिद्ध करण्यात येत आहे.)

**स्वा/-**
**उप-प्रादेशिक अधिकारी**
**म.प्र.नि.मंडळ,अमरावती-१ तथा**
**समन्वयक, पर्यावरण विषयक जनसुनावणी.**